# उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय, जिल्हा रत्नागिरी
# कोतवाल संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात 2023
# जाहिरात क्रमांक 01/2023

रत्नागिरी जिल्हयातील **रत्नागिरी** उपविभागातील **रत्नागिरी व संगमेश्वर** तालुक्यातील सजेतील **कोतवाल** या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनंच **https://ratnagiri.ppbharti.in** यासंकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10, दि.17 मे, 2023 अन्वये सन 2023-(कोतवाल पदभरती) बाबत कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80 टक्के मर्यादेत पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे.**

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरूवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 25/09/2023 रोजी पासून | दिनांक - 09/10/2023 सायं. 23.59 वा पर्यंत |

**परीक्षा शुल्क खालील प्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग - | रुपये 600/- | Online payment पद्धतीने |
| आरक्षित/आर्थिक घटक प्रवर्गासाठी - | रुपये 500/- | |

**(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

Phone pe, GPay, **नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्डद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.**

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (**Payment Transaction Successful**) झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग/डेबिटकार्ड/क्रेडीट कार्ड/गुगल पे/फोन पे वापरून होणा-या व्यवहारांची संपूर्णतः जबाबदारी उमेदवाराची आहे व त्यास उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी जबाबदार असणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात **https://ratnagiri.ppbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. कोतवाल पदाचे परीक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले व विहीत परीक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यात अंशत : बदल करणे, पदाच्या एकूण संख्येत व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद/तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. रत्नागिरी उपविभागातील कोतवाल या पदाची भरावयाची पदे व त्यांचे आरक्षण पुढील प्रमाणे आहे.

रिक्त पदांचा तपशील-

**कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात)** (दरमहा मानधन रक्कम रु. 15,000/- (रुपये पंधरा हजार फक्त))

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र.191/ई-10, दिनांक 06/04/2023.

| अ. क्र. | तालुका | सजा | सजेस असलेले आरक्षण | समांतर महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | झाडगाव म्यु.आत | अनुसूचित जमाती | ---- |
| 2 | रत्नागिरी | नाचणे म्यु.आत | अनुसूचित जमाती | ---- |
| 3 | रत्नागिरी | मिरजोळे | ---- | अनुसूचित जमाती (महिला) |
| 4 | रत्नागिरी | नेवरे | अनुसूचित जमाती | ---- |
| 5 | रत्नागिरी | चाफे | भटक्या जमाती (क) | ---- |
| 6 | रत्नागिरी | मावळंगे | भटक्या जमाती (ड) | ---- |
| 7 | रत्नागिरी | खानू | खुला | ---- |
| 8 | रत्नागिरी | जयगड | ---- | खुला (महिला) |
| 9 | रत्नागिरी | केळये | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ----- |
| 10 | रत्नागिरी | निवेंडी | खुला | ----- |
| 11 | रत्नागिरी | हातखंबा | ----- | खुला (महिला) |
| 12 | रत्नागिरी | जांभरुण | खुला | ----- |
| 13 | रत्नागिरी | उक्षी | खुला | ----- |
| 14 | रत्नागिरी | फणसोप | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ------ |
| 15 | संगमेश्वर | नायरी | ---- | अनुसुचित जाती (महिला) |
| 16 | संगमेश्वर | आंबेड बुद्रुक | अनुसूचित जमाती | ----- |
| 17 | संगमेश्वर | तेऱ्ये | ---- | अनुसुचित जमाती (महिला) |
| 18 | संगमेश्वर | कर्ली | अनुसूचित जमाती | ----- |
| 19 | संगमेश्वर | माखजन | अनुसूचित जमाती | ----- |
| 20 | संगमेश्वर | कासे | अनुसूचित जमाती | ----- |
| 21 | संगमेश्वर | चिखली | ---- | विमुक्त जाती (अ) (महिला) |
| 22 | संगमेश्वर | निनावे | भटक्या जमाती (क) | ----- |
| 23 | संगमेश्वर | पोचरी | ---- | इतर मागास प्रवर्ग (महिला) |
| 24 | संगमेश्वर | आंगवली | इतर मागास प्रवर्ग | ---- |
| 25 | संगमेश्वर | मुरडव | ---- | इतर मागास प्रवर्ग (महिला) |
| 26 | संगमेश्वर | राजवाडी | इतर मागास प्रवर्ग | ---- |
| 27 | संगमेश्वर | वांद्री | ---- | इतर मागास प्रवर्ग (महिला) |
| 28 | संगमेश्वर | पुर्ये त. देवळे | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ------ |
| 29 | संगमेश्वर | कळंबुशी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ------ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 30 | संगमेश्वर | सांगवे | ------ | खुला (महिला) |
| 31 | संगमेश्वर | उमरे | ------ | खुला (महिला) |
| 32 | संगमेश्वर | कळंबस्ते | ------ | खुला (महिला) |

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र. पीकेए/1051/ल-6, दिनांक 07/05/1959 प्रमाणे कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबतच्या अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील.** तसेच कोतवाल पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.

**कोतवाल पदासाठी किमान आवश्यक अर्हता-**

1) अर्जदार हा चौथी उत्तीर्ण असावा.

2) (अ) वयोमर्यादे करीता अर्जदाराचे दिनांक 25 सप्टेंबर 2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
(ब) अर्जदाराचे वय दिनांक 25 सप्टेंबर 2023 रोजी 18 पेक्षा कमी नसावे व 40 पेक्षा जास्त नसावे.
(क) कोतवाल पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.

3) अर्जदार हा ज्या तालुक्यातील सजासाठी अर्ज करणार आहे त्या तालुक्यातील कायम रहिवासी असणे आवश्यक आहे.त्यासाठीचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.

5) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक आहे. (अर्जदार यास अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)

6) अनु. जाती, अनु. जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज- ब, क, ड प्रवर्गाच्या आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

7) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज- ब, क, ड या प्रवर्गातील अर्जदार यांना भरती कालावधी करीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा अ व भज- ब, क, ड या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना भरती कालावधी करीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

9) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**परीक्षेचे स्वरुप-**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | लेखी परीक्षेसाठी गुण |
|---|---|---|
| 1 | **कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात)** | 100 |

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील-**

1) कोतवाल पदाची लेखी परीक्षा 100 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न दोन गुणाचा राहील.

2) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.(प्रश्न संख्या 50)

3) लेखी परीक्षा इयत्ता चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यात सामान्य ज्ञान, गणित, कोतवालाचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती, चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.

4) कोतवाल भरती/निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 100 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 40 गुण प्राप्त करणारे उमेदवार पात्र ठरतील.

Created in Master PDF Editor

5) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करावा लागेल.
6) लेखी परीक्षेमध्ये जास्त गुण प्राप्त करणारा उमेदवार अंतिम निवडीस पात्र ठरेल.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारास पात्रता व शैक्षणिक इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परीक्षा,कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम याबाबतच्या विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरच उपलब्ध करुन देण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3) लेखी परीक्षेअंती पात्र अर्जदाराची आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती याची पडताळणी मूळ कागदपत्रावरुन करण्याकरीता अंतरीम यादी जाहीर करण्यात येईल. जे अर्जदार जाहिरातीतील आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क आणि कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल. त्या अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, अर्जात भरलेली माहिती व तपासणीच्या वेळी सादर केलेली मूळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परीक्षा शुल्क व इतर सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.
4) अर्जदार शारीरिकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांनी दिलेले मूळ प्रमाणपत्र अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र हे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6) अर्जदार हा ज्या तालुक्यातील पदासाठी अर्ज केला आहे त्या तालुक्यातील कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
7) प्रत्येक सजास केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरीक्त उमेदवारांनी अर्ज करु नये.)
8) रत्नागिरी उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व सजांसाठी एकाच दिवशी व एकाच वेळी परीक्षा घेण्यात येईल.
9) संपूर्ण भरती प्रक्रिया सजा निहाय होणार असून कोणत्याही दोन सजाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
10) कोतवाल हे पद वर्गीकृत नाही.
11) कोतवाल क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारीरिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.
12) कोतवाल हे पद एका सजात एकच असते, त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.
13) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग ) यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 था महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी, 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड). विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे

वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

14) महिलांसाठी आरक्षीत पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2, दि. 4 मे,2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदाच्या निवडीकरिता नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदाच्या निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

15) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कागदपत्र पडताळणीच्या वेळी सदर मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांना विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

17) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दिनांक 28/02/1974 नुसार कोतवाल म्हणून नेमणूक करतांना इतर सर्व निकष समान असतील तर पुर्वीच्या कोतवालांच्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल.

ज्या उमेदवारांनी हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वी कोतवाल पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत-**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त **https://ratnagiri.ppbharti.in** या अधिकृत संकेतस्थळावरून विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना **उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी** हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

2) उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **https://ratnagiri.ppbharti.in** या वेबसाईटद्वारे दि. 25/09/2023 ते दि. 09/10/2023 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

3) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका

झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

4) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही मूळ कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार **उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी** यांनी राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **https://ratnagiri.ppbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेट बँकींग/डेबिट कार्ड/ क्रेडीट कार्ड/गुगल पे /फोन पे वापरुन होणा-या व्यवहाराची संपूर्णत: जबाबदारी उमेदवाराची आहे व त्यास **उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी** जबाबदार असणार नाही.

6) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना स्वत:चा अद्ययावत (Latest) विहीत नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन **https://ratnagiri.ppbharti.in** मधील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

7) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेत स्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

8) उमेदवाराची स्थिती, परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती नमूद केलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

9) उमेदवाराने यापूर्वी जरी त्याचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/सेवायोजन कार्यालय /समाजकल्याण विभाग/आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे नोंदविलेले असले तरी अशा उमेदवाराला विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारानी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

10) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग ) यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी, 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड). विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

Created in Master PDF Editor

11) महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2, दि.4 मे, 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांच्या निवडीकरिता नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

12) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12, दि. 28 मार्च, 2005 व शासन परीपत्रक एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12, दि. 01 जुलै, 2005 नुसार विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञा पत्राचा नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र हे मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

13) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस/मूळ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

14) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररीत्या कळविण्यात येणार नाही.

15) लेखी परीक्षा, मूळ कागदपत्रांची पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदाराना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

16) वरील अटी, शर्ती व नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय या प्रक्रियेस लागू राहतील.

(जीवन देसाई)
**उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी**
**तथा अध्यक्ष, कोतवाल पदभरती**
**प्रक्रिया समिती रत्नागिरी-2023**

दिनांक :- 25/09/2023
ठिकाण:- रत्नागिरी

Created in Master PDF Editor